ePaper
वारा आणि आभाळ बघून गणित बांधायचं, भाजप प्रवेशाच्या चर्चांवर अमोल कोल्हेंचं सूचक उत्तर



| वर्ष - 6 | अंक - 222 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## आतील पानांत

- छापील वीजदेयक बंद करून पुणेकरांचा पर्यावरणास हातभार
- आयुक्तसाहेब वेळीच सावध व्हा!
- राज्यपालांची बौद्धीक दिवाळखोरी

www.mahaenews.com | शुक्रवार | दिनांक25 नोव्हेंबर 2022 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# निवासी सदनिकांवर टाच!

## एकाच दिवशी 50 सदनिका सील : आत्तापर्यंत 300 पेक्षा जास्त मिळकती जप्त



> महापालिकेचा उत्पन्नाचा मुख्य स्रोत हा मालमत्ता कर आहे. मात्र, शहरातील तीन लाख निवासी मालमत्ता धारकांकडे तब्बल 583 कोटी रुपयांचा कर थकीत आहे. वारंवार कर भरण्याचे आवाहन करून मालमत्ताधारक कर भरत नसल्याने महापालिकेला नाईलाजाने कठोर भूमिका घ्यावी लागत आहे. बुधवारी एकाच दिवशी शहरातील नामांकित सोसायट्यांमधील 50 सदनिका सील करण्यात आल्या आहेत. यापुढील काळातही थकबाकीदारांच्या सदनिका सील करण्याची मोहीम अधिक तीव्र करण्यात येणार आहेत. त्यामुळे मालमत्ता धारकांनी थकबाकी आणि चालू वर्षाचा कर भरून महापालिकेला सहकार्य करावे.
>
> **- निलेश देशमुख,** सहाय्यक आयुक्त.

**|पिंपरी-चिंचवड |**
**| महाईन्यूज | प्रतिनिधी|**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागाच्या वतीने थकबाकीदारांवर जप्तीची धडक कारवाई करण्यात येत आहे. बुधवारी (दि.२३) रोजी एकाच दिवशी शहरातील विविध भागातील नामांकित सोसायट्यांमधील तब्बल ५० सदनिका सील करण्यात आल्या. या सदनिका धारकांकडे ५५ लाखांची थकबाकी आहे. त्यामुळे थकबाकीदारांनी थकीत कर भरून महापालिकेला सहकार्य करावे. तसेच जप्तीची कारवाई टाळावी, असे आवाहन सहाय्यक आयुक्त निलेश देशमुख यांनी केले आहे. पिंपरी-चिंचवड शहरातील 50 हजारांपुढे थकबाकी असणाऱ्या 26 हजार 760, पाच लाखांपेक्षा अधिक थकबाकी असलेल्या व्यावसायिक 1 हजार 361 तर मालमत्ता कराचा एकदाही भरणा न केलेल्या 3 हजार 850 अशा 31 हजार 971 मिळकत धारकांना जप्तीच्या नोटीसा कर आकारणी व कर संकलन विभागाने दिल्या आहेत. तसेच तीन लाख निवासी मालमत्ता धारकांकडे तब्बल 583 कोटी रुपयांचा कर थकीत असल्याचेही देशमुख यांनी सांगितले.

शहरात 5 लाख 82 हजार मिळकतींची नोंद आहे. चालू आर्थिक वर्षांत आत्तापर्यंत 2 लाख 87 हजार 446 मालमत्ता धारकांनी 466 कोटी रूपये कराचा भरणा केला आहे. 2022-23 या आर्थिक वर्षाचे कर आकारणी व कर संकलन विभागाने 1000 कोटींचे उद्दिष्ट ठेवले आहे. हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी किमान 85 टक्के मालमत्तांचा टॅक्स वसूल करणे आवश्यक आहे.

### या नामांकित सोसायट्यांमधील सदनिका सील

पिंपरीतील ॲंथिया, रावेतमधील पंचवटी, रेनबो, प्रोबो, वाकडमधील मॉन्ट व्हर्ट सेविल, पुनावळेतील सियोना, पिंपळे-सौदागर येथील शुभश्री वुड्स, लाईफ स्टाईल, चिंचवड येथील माइंड्स्पेस रिआलिटी क्वीन्स टाऊन, तळवडेतील देवी इंद्रायणी सोसायटी.

### ...तर जप्त केलेल्या मालमत्तांचा जाहीर लिलाव

थकबाकी असणाऱ्या मालमत्ता जप्त केल्यानंतर अनेक मालमत्ता धारक त्वरीत कर भरत आहेत. मात्र, मालमत्ता जप्तीनंतरही काही जण कर भरत नसल्याचे समोर आले आहे. अशा मालमत्तांच्या लिलावाची कार्यपद्धती ठरवण्यात आली आहे आणि त्याला स्थायी समितीची मान्यता पण घेण्यात आली आहे. मालमत्ता जप्त केल्यानंतर 21 दिवसांच्या आत कर न भरणाऱ्या मालमत्ता धारकांच्या मिळकतीचा जाहीर लिलाव करण्यात येणार आहे, असा इशाराही सहाय्यक आयुक्त निलेश देशमुख यांनी दिला आहे.

---

### उद्योगमंत्र्यांच्या बैठकीत ठोस निर्णयाचा अभाव

# लघुउद्योजकांच्या समस्या भाजपाचे अपयश

## अजित गव्हाणे : सत्ताधाऱ्यांनी लघुउद्योजकांच्या तोंडाला पाने पुसली

**|पिंपरी-चिंचवड |**
**| महाईन्यूज | प्रतिनिधी|**



पिंपरी-चिंचवड तसेच चाकण परिसरातील लघुउद्योजकांना भेडसावणाऱ्या समस्यांबाबत उद्योगमंत्री उदय सामंत यांच्यासोबत झालेल्या बैठकाचा केवळ फार्स करणाऱ्या आला असून लघुउद्योजकांच्या तोंडाला पाने पुसण्याचा प्रकार घडला आहे. गेल्या दहा वर्षांत आपल्याच सत्ताकाळात एकही समस्या सोडवू न शकलेल्या भाजपच्या नेतृत्त्वाने आपल्याच अपयशाचा आरासा दाखविल्याचा हल्लाबोल राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष अजित गव्हाणे यांनी केला आहे.

याबाबत अजित गव्हाणे यांनी एक पत्रक प्रसिद्धीस दिले असून त्यात म्हटले आहे की, गेल्या पाच वर्षांत भाजपच्या सत्ताधाऱ्यांना एकही वेळेस लघुउद्योजकाची आठवण झाली नाही. महापालिकेशी निगडीत अनेक प्रश्न सोडविण्यासाठी कोणताही प्रयत्न करण्यात आला नाही. मात्र आता महापालिकेच्या निवडणुका तोंडावर आल्याने भाजपचे शहराध्यक्ष तथा आमदार महेश लांडगे यांना लघुउद्योजकांचा पुळका आला आहे. महापालिका, महावितरण, वाहतूक विभागाशी संबंधित प्रश्नांवर उद्योगमंत्र्यांच्या सोबत बैठक घेण्यात आली आहे.

या बैठकीतून लघुउद्योजकांचे प्रश्न सोडविण्याऐवजी स्वत:ची राजकीय पोळी भाजण्याचाच प्रकार यातून करण्यात आला आहे. केवळ आश्वासने आणि सूचना यापलिकडे बैठकीत काहीच झाले नाही. एकाही विषयावर ठोस निर्णय झालेला नसतानाही 'रेडकार्पेट'च्या गप्पा भाजपच्या नेत्यांकडून मारल्या जात आहेत, हे दुर्देव आहे.गल्ली ते दिल्ली सत्ता उपभोगणाऱ्या भाजप नेत्यांनी लघुउद्योजकांकडे आणि त्यांच्या समस्यांकडे दूर्लक्ष केल्यामुळे पिंपरी-चिंचवड शहरातील लघुउद्योजकांना यातना सहन कराव्या लागत आहेत. बस सुविधा, कचरा समस्या, वाढत्या झोपडपट्ट्या, अनधिकृत भंगाराची दुकाने, वृक्ष लागवड, वृक्ष संवर्धन, महापालिकेकडून दिल्या जाणाऱ्या समस्यांसाठी उद्योगमंत्र्यांसोबत बैठकीचा फार्स करणाऱ्या भाजप नेत्यांनी गेल्या पाच वर्षांत महापालिकेच्या माध्यमातून या समस्या का सोडविल्या नाहीत, याचे उत्तर पहिल्यांदा द्यावे. शास्तीकर, रेडझोन, खंडीत वीजपुरवठा या समस्या उद्योग मंत्रालया अंतर्गत येतात का?

### रेडझोन, शास्तीकराचा विसर...

सातत्याने रेडझोन सोडविण्याचे आणि शास्तीकर माफ करण्याचे आश्वासने भाजपने जनतेला दिले आहे. गल्लीपासून दिल्लीपर्यंत त्यांच्याच पक्षाचे सरकार असतानाही त्यांना हा प्रश्न सोडविण्यात अपयश आले आहे. केवळ पत्रकबाजीत पुढे असणाऱ्या भाजपचेच राज्यात सरकार आहे. शास्तीकरावर गळा काढणारे भाजप नेते शास्तीकरावर काहीच बोलायला तयार नाहीत. नवी 'गाजरे' दाखविण्याऐवजी गेल्या पाच वर्षांत काय काम केले त्याचा हिशोब त्यांनी जनतेसमोर मांडावा, असे आव्हानही अजित गव्हाणे यांनी केले आहे.

# छापील वीजदेयक बंद करून पुणेकरांचा पर्यावरणास हातभार

## महावितरणच्या 'गो-ग्रीन'मध्ये 89 हजार ग्राहकांचा सहभाग

**पुणे ।महाईन्यूज ।**

**महावितरणकडून देण्यात येणारे छापील वीजदेयक बंद करून केवळ ई-मेल किंवा एसएमएसच्या माध्यमातून देयकाचा स्वीकार करणाऱ्या ग्राहकांची संख्या दिवसेंदिवस पुण्यात वाढत आहे. महावितरणच्या 'गो-ग्रीन' या उपक्रमात एकूण ८९ हजार पुणेकर वीज. ग्राहक सहभागी झाले असून, पर्यावरणाच्या रक्षणात ते खारीचा वाटा उचलत आहेत. गेल्या सहा महिन्यांत १४ हजार १४० ग्राहकांनी नव्याने या योजनेत सहभाग नोंदविला आहे.**

महावितरणच्या 'गो-ग्रीन' योजनेनुसार छापील वीजदेयकाच्या कागदाऐवजी केवळ ई-मेल, एसएमएसचा पर्याय निवडल्यास वीजग्राहकांना प्रत्येक देयकात १० रुपये सवलत देण्यात येत आहे. त्यामुळे योजनेत सहभागी ग्राहकांची वार्षिक १२० रुपयांची बचत होत आहे. महावितरणच्या संगणकीय प्रणालीद्वारे वीजदेयक तयार झाल्यानंतर लगेचच ते 'गो-ग्रीन' योजनेतील ग्राहकांना ई-मेलद्वारे पाठविण्यात येत आहे. एसएमएसद्वारे देयकाची माहिती देण्यात येत आहे. त्यामुळे मुदतीत देयक भरल्याच्या योजनेला लाभही ग्राहकाला घेता येतो. पुणे परिमंडल



अंतर्गत पुणे शहरातील ४७ हजार ५७४ तर पिंपरी-चिंचवड शहरातील २६ हजार ११७ तसेच आंबेगाव, जुन्नर, खेड, मावळ, मुळशी, वेल्हे आणि हवेली तालुक्यामध्ये १५ हजार २३४ ग्राहकांनी वीजदेयकांसाठी छापील कागदाऐवजी ई-मेल, एसएमएसला पसंती देत पर्यावरणपूरक योजनेत सहभाग घेतला आहे. महावितरणची 'गो-ग्रीन' योजना ही काळाची गरज असून जास्तीत जास्त वीजग्राहकांनी कागदविरहित वीजदेयकांसाठी या योजनेत सहभागी व्हावे, असे आवाहन महावितरणकडून करण्यात आले आहे.

### योजनेस सहभागी होण्यासाठी...

महावितरणच्या 'गो-ग्रीन' योजनेचा पर्याय निवडण्यासाठी ग्राहकांनी वीजदेयकावर छापलेल्या जीजीएन (GGN) या १५ अंकी क्रमांकाची नोंदणी महावितरणच्या मोबाइल ॲपद्वारे किंवा महावितरणच्या संकेतस्थळाच्या HTTPS://BILLING.MAHADISCOM.IN/GOGREEN.PHP लिंकवर जाऊन करावी. याबाबतची अधिक माहिती HTTP://WWW.MAHADISCOM.IN संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

### मूळ स्वरूपातील देयक उपलब्ध

'गो-ग्रीन' योजनेत सहभागी झालेल्या वीजग्राहकांना छापील वीजदेयकांची गरज भासल्यास त्यांना ईमेलद्वारे प्राप्त झालेले दरमहा वीजदेयक संगणकात जतन करून ठेवता येईल. सोबतच महावितरणच्या HTTP://WWW.MAHADISCOM.IN या अधिकृत संकेतस्थळावर चालू वीजदेयकांसह एकूण १२ महिन्यांचे वीज देयक मूळ स्वरूपात उपलब्ध आहेत.

# "माझी बायको होशील का?" इन्स्टाग्राम स्टेटस ठेवणाऱ्या १४ वर्षांच्या मुलावर गुन्हा

## पुण्यातील धक्कादायक घटना

**पुणे ।महाईन्यूज ।**

सध्या तरुणाईचे आकर्षण असलेल्या सोशल मीडियाचा गैरवापर वाढतोय. सोशल मीडियावर चिथावणीखोर मजकूर, छायाचित्रे प्रसिद्ध केली जात आहेत. पण, प्रौढांपर्यंत मर्यादीत असलेला सोशल मीडिया पालकांमुळे अल्पवयीन मुलांच्या हाती लागल्याने त्याचे दुष्परिणामही समोर येत आहेत. त्यात आता पुण्यात एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. येथील एका १४ वर्षीय मुलाने स्वत:च्या सोशल मीडियावर आपल्या वर्गातील एका मुलीचा फोटो स्टेटसवर ठेऊन 'माझी बायको होशील का?,' असे विचारले आहे.

हा प्रकार समोर आल्यानंतर मुलीच्या आईने मुलाविरोधात गुन्हा दाखल केला आहे. याप्रकरणात पोलीस तपास करत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मुलाने या मुलीकडे मैत्रीची मागणी केली होती. माझ्याशी मैत्री कर नाहीतर तुला उचलून घेऊन जाईल, असे मुलाने म्हटलं होतं. मुलीने उत्तर न दिल्याने 'माझी बायको होशील का?' असा स्टेटस मुलाने इन्स्टाग्रावर ठेवला. याबाबत बोलताना वरिष्ठ पोलीस निरीक्षक अरविंद गोकुळे म्हणाले, "दोन्ही मुलं आठवीच्या वर्गात शिकत आहे. मागील एक महिन्यापासून मुलगा मुलीचा पाठलाग करत मैत्री करण्याची विनंती करत होता. त्यानंतर मुलीच्या मैत्रिणीने तिला सांगितलं, तुझा फोटो मुलाने इन्स्टाग्रामवर ठेऊन 'माझी बायको होशील का'? असं लिहलं आहे. ही माहिती कुटुंबियांना दिल्यावर मुलीच्या आईने गुन्हा दाखल केला आहे. सध्या मुलाची परिक्षा सुरु आहे.

# विक्रम गोखलेंचं निधन ही अफवा

## प्रकृती चिंताजनक – पत्नीचा खुलासा

**पुणे। महाईन्यूज ।**

ज्येष्ठ अभिनेते विक्रम गोखले अत्यवस्थ असल्याची माहिती गोखले यांचे निकटवर्तीय असलेल्या राजेश दामले यांनी पत्रकार परिषदेमध्ये दिली. पुण्यातील दिनानाथ मंगेशकर रुग्णालयामध्ये गोखले यांच्यावर उपचार सुरु आहेत. गोखले यांच्या निधनाची बातमी चुकीची असल्याचं यापूर्वीच त्यांची पत्नी वृषाली यांनी प्रसारमाध्यमांना सांगितलं आहे. विक्रम गोखलेंच्या निधनाचं वृत्त ही अफवा असून ते सध्या व्हेंटीलेटरवर आहेत असं वृषाली यांनी सांगितलं आहे.



सकाळी ११ वाजता गोखले यांच्या प्रकृतीसंदर्भातील माहिती दामले यांनी दिली. गोखले यांची प्रकृती अद्यापही अत्यावस्थ आहे असं दामले यांनी पत्रकार परिषदेत सांगितलं.

विक्रम गोखले यांची प्रकृती चिंताजनक आहे. खूप कॉम्पलिकेशन्स आहेत. त्यांच्याकडून म्हणवा तसा प्रतिसाद मिळत नाहीय. जोपर्यंत डॉक्टर काही सांगत नाहीत. तोपर्यंत पुढे काही सांगू शकत नाहीत. अफवांवर कोणी ही विश्वास ठेऊ नका, डॉक्टरांकडून प्रयत्न सुरू आहेत, असं दामले यांनी पत्रकार परिषदेत सांगितलं. गोखले यांच्या प्रकृतीसंदर्भात रात्रीपासूनच उलट-सुलट चर्चांना उधाण आलं आहे. याच पार्श्वभूमीवर रात्री उशीरा गोखले यांच्या पत्नी वृषाली यांनी गोखले व्हेंटीलेटरवर असल्याचं स्पष्ट केलं. "काल सायंकाळी ते कोमामध्ये गेले. त्यानंतर ते स्पर्शालाही प्रतिसाद देत नसून त्यांना सध्या व्हेंटीलेटरवर ठेवण्यात आलं आहे.

# 'लोणावळा ते पुणे रेल्वे शटल सेवा पूर्ववत करा'

## चाकरमान्यांचे लोणावळा रेल्वे स्टेशनवर आंदोलन

**पिंपरी ।महाईन्यूज ।**

लोणावळा ते पुणे रेल्वे स्थानक लोकल सेवा पूर्ववत व्हावी यासाठी आज लोणावळ्यात काही चाकरमान्यांनी आंदोलन केले. तळेगाव आणि पिंपरी-चिंचवडमधून लोणावळ्याला जाणाऱ्यांची संख्या मोठी असल्याने शटल सेवा सुरू करण्यात यावी, या मागणीसाठी हे आंदोलन करण्यात आलं.

शेकडो नोकरदार पुणे ते लोणावळा दरम्यान रेल्वेने प्रवास करत असतात. पण, लोकलसेवा सेवा पूर्ववत राहिली नसल्याने जुन्या वेळापत्रकानुसार लोकल सेवा सुरू करण्यात यावी, अशी मागणी नोकरदार वर्ग करत आहेत. अनेकदा तळेगाव स्थानकात किंवा लोणावळ्यात तासंतास लोकलची वाट पहावी लागते.

यामुळं नोकरदारवर्ग नाराज आहे. रेल्वे सेवा देत असताना लोकलने उशीर करू नये, शटल सेवा सुरू करावी, जुन्या वेळापत्रकानुसारच रेल्वे सेवा पूर्ववत करावी, सर्व लोकल पुणे ते लोणावळा असाव्यात, अशा मागण्या चाकरमान्यांच्या आहेत. रेल्वेच्या फलाटावर आंदोलन करत असताना रेल्वे पोलिसांनी हे आंदोलन थांबवण्याचा प्रयत्न केला. महिलांचा सहभाग देखील या आंदोलनात लक्षणीय होता.



# आयुक्तसाहेब वेळीच सावध व्हा!

## आमदार लक्ष्मण जगताप : वायसीएम रुग्णालयात स्वतंत्र गोवर आयसोलेशन कक्ष सुरू करा

**पिंपरी।**
**। महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**गोवर या संसर्गजन्य रोगाचा बालकांमध्ये लागण होताना दिसत आहे. मुंबई व अन्य शहरांमध्ये या रोगाचा प्रादुर्भाव वाढला आहे. त्या पार्श्वभूमीवर पिंपरी-चिंचवडमध्येही खबरदारी घेण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे महापालिकेच्या वायसीएम रुग्णालयात स्वतंत्र गोवर आयसोलेशन कक्ष तातडीने तयार करण्याची सूचना आमदार लक्ष्मण जगताप यांनी महापालिका आयुक्त शेखर सिंह यांना केली आहे. तसेच डेंग्यू आजाराने शहराला विळखा घातलेला असल्यामुळे त्याला आळा घालण्यासाठीही आरोग्य आणि वैद्यकीय विभागामार्फत तातडीने उपाययोजना राबवण्यासही त्यांनी आयुक्तांना सांगितले आहे.**



यासंदर्भात आमदार लक्ष्मण जगताप यांनी महापालिका आयुक्त शेखर सिंह यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे, "सध्या मुंबई व ठाण्यामध्ये तसेच महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात काही ठिकाणी गोवर आजाराचे असंख्य लहान बालक आढळून येत आहेत. आता पिंपरी-चिंचवड आणि पुणे शहरातही या आजाराने डोके वर काढण्यास सुरूवात केली आहे. गोवर हा वेगाने पसरणारा संसर्गजन्य आजार आहे. त्यामुळे आपल्या शहरातही हा आजार मोठ्या प्रमाणात पसरल्यास अनेक लहान बालकांच्या जिवाला धोका ठरू शकतो. या आजाराबाबत निष्काळजीपणा करून चालणार नाही. गोवर या आजारावर अद्याप कोणतेही औषध नाही. लस देणे हा एकमेव पर्याय आहे. तसेच गोवर झाल्यानंतर केवळ त्याची लक्षणे नियंत्रित करून उपचार केले जातात. याला प्रतिबंध घालण्यासाठी व रोगाचा वाढता संसर्ग रोखण्यासाठी तातडीने उपाययोजना करणे गरजेचे आहे. त्यामुळे या रोगाला तातडीने प्रतिबंध करण्यासाठी महापालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयात स्वतंत्र गोवर आयसोलेशन कक्ष तयार करण्याची नितांत गरज आहे. त्याची प्रशासनाने लवकरात लवकर अंमलबजावणी करावी. परिस्थिती हाताबाहेर जाऊ नये म्हणून प्रशासनाने गोवर आयसोलेशन कक्ष तयार करून त्यासाठी आवश्यक मनुष्यबळ व यंत्रसामुग्री उपलब्ध करण्याची दक्षता घ्यावी.

> **शहरात डेंग्यूच्या रुग्णांची संख्या वाढली आहे. या आजाराने संपूर्ण शहरालाच विळखा घातले आहे. या आजारालाही पायबंद घालण्यासाठी आरोग्य आणि वैद्यकीय विभागामार्फत विशेष उपाययोजना करण्यात यावी. संपूर्ण शहरात औषधांची फवारणी करण्यात यावी. त्याचप्रमाणे डेंग्यू आजाराबाबत पुरेश जनजागृती करून नागरिकांनाही स्वच्छतेबाबत जागृत करावे. आधीच कोरोनामुळे त्रस्त होऊन त्यातून कसेबसे सावणाऱ्या नागरिकांना संसर्गजन्य आजारांनी पुन्हा त्रस्त केले आहे. त्यामुळे महापालिका प्रशासनाने नागरिकांच्या आरोग्याबाबत विशेष काळजी घेण्याची आवश्यकता आहे. तशी ती घेण्यात यावी, अशी सूचना त्यांनी केली आहे.**
> **- लक्ष्मण जगताप, आमदार, चिंचवड.**




# पिंपरी-चिंचवडमधील लघुउद्योगांना राज्य सरकारचे "रेड कार्पेट"

## मुंबईतील मॅरेथॉन बैठकीत प्रलंबित प्रश्नांना गती

**पिंपरी ।**
**। महाईन्यूज । प्रतिनिधी।**

पिंपरी-चिंचवड औद्योगिक पट्ट्यातील लघुउद्योगांना शिंदे-फडणवीस सरकारकडून 'रेड कार्पेट' तयार केले जात असून, विविध प्रलंबित प्रश्नांना गती दिली आहे. त्यामध्ये औद्योगिक पट्ट्यातील भूयारी गटार योजना व सी.इ.टी.पी. प्लांट, खंडीत वीज पुरवठा, कचरा समस्या, अग्निशमन केंद्र, पीएमपीएमएल बस सुविधा यासह विविध समस्या मार्गी लावण्यात आल्या आहेत. मुंबईतील विधानभवन येथे राज्याचे उद्योग मंत्री उदय सामंत यांच्या उपस्थितीत आज पिंपरी-चिंचवड आणि परिसरातील लघुउद्योगांचे प्रतिनिधी आणि प्रमुख अधिकारी यांची महत्त्वपूर्ण बैठक झाली. यावेळी भाजपा शहराध्यक्ष



तथा आमदार महेश लांडगे, पिंपरी-चिंचवड लघुउद्योग संघटनेचे अध्यक्ष संदीप बेलसरे, उपाध्यक्ष संजय जगताप, विनोद नाणेकर, संचालक संजय सातव, प्रमोद राणे, विजय खळदकर, नवनाथ वायाळ, भारत नरवडे, उमेश लोंढे, अतूल इनामदार, महापालिका अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे-पाटील, मुख्य शहर अभियंता मकरंद निकम यांच्यासह त्या-त्या विभागाचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

पिंपरी-चिंचवड लघुउद्योग संघटनेच्या पुढाकाराने आणि आमदार महेश लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली लघु उद्योजकांनी राज्य सरकारकडे विविध मागण्यांसाठी पाठपुरावा केला. त्याला राज्य सरकारकडून सकारात्मक प्रतिसाद मिळाला आहे, अशी माहिती अध्यक्ष संदीप बेलसरे यांनी दिली. संदीप बेलसरे म्हणाले की, पिंपरी-चिंचवडमधील लघुउद्योगांच्या विविध मागण्या आणि समस्यांबाबत उद्योगमंत्र्यांनी अत्यंत सकारात्मक भूमिका घेतली. आतापर्यंतच्या इतिहासात पहिल्यांदा असा उद्योग मंत्री आहे. ज्यांनी लघुउद्योजकांच्या समस्या समजून घेतल्या आणि त्यावर अत्यंत जलदगतीने निर्णय घेतले. उद्योगांवरील शास्तीकराच्या बाबतीतही मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांच्याशी चर्चा करुन निर्णय घेवू, असे आश्वासन उद्योगमंत्र्यांनी दिले आहे. विशेष म्हणजे, संघटनेच्या कार्यालयासाठी एस-२ ब्लॉकमध्ये राखीव असलेल्या भूखंड देण्याबाबत मान्यता देण्यात आली.

### बैठकीत झालेले निर्णय पुढीलप्रमाणे

**औद्योगिक पट्ट्यातील भूयारी गटार योजना व सी.इ.टी.पी. प्लाँटसाठी जागा उपलब्ध करुन देण्यात आहे. याबाबत तात्काळ 'डीपीआर' तयार करावा, असे आदेश उद्योगमंत्री उदय सामंत यांनी दिले आहेत. या प्रकल्पाचा खर्च एमआयडीसी, एमपीसीबी, महापालिका आणि उद्योजक अशा तीन अस्थापनांकडून केला जाईल. भूयारी गटार योजनेबाबत महापालिका प्रशासनाने चालढकल करु नये. त्यासाठी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी एकत्रितपणे निर्णय घ्यावा. आवश्यकता भासल्यास राज्य सरकार निधी उपलब्ध करेल. औद्योगिक पट्ट्यात अखंडीत वीज पुरवठा सुरळीत ठेवण्याबाबत मोशी, तळवडे आणि भोसरी येथे सब-स्टेशन उभारण्यात यावेत. यासह चार लहान सब-स्टेशन उभारण्याबाबत महावितरण प्रशासनाने तात्काळ कार्यवाही करावी. त्यासाठी आवश्यक मोकळ्या जागा हस्तांतरीत करण्याचे आदेश दिले आहेत. तसेच, जुनी वीज यंत्रणा आहे त्याची देखभाल दुरुस्ती दीड महिन्यांत पूर्ण करण्यात येणार आहे. वीज यंत्रणा सक्षम करण्यासाठी ४१ कोटी रुपयांचा 'डीपीआर' तयार करण्यात येत आहे. यासह औद्योगिक पट्ट्यातील कचरा समस्या मार्गी लावण्याबाबत महापालिका अधिकाऱ्यांना आदेश देण्यात आले. अग्निशमन केंद्र एक वर्षांत पूर्ण करणार, वाहतूक व्यवस्था, अनधिकृत भंगार दुकानांवरील कारवाई, एक खिडकी योजना, औद्योगिक प्रशिक्षण केंद्र आदी प्रमुख विषयांवर सकारात्मक निर्णय घेवून कार्यवाहीचे आदेश दिले आहेत.**

# राज्यपालांची बौद्धीक दिवाळखोरी!



भूमिका

निलेश दुटाळ
91- 87668 40811

**महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल मा. श्री. भगतसिंग कोश्यारी यांना सतत चर्चेत राहण्याची आवड निर्माण झाली असल्याकारणाने ते महाराष्ट्र किंवा महाराष्ट्रातील महापुरुष व समाजसुधारक यांच्याबद्दल चुकीचे वक्तव्य करत आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या दिक्षांत समारंभात बोलताना राज्यपाल यांनी छत्रपती शिवाजी महाराजांबाबत वादग्रस्त विधान केले आहे. तुमचा आदर्श कोण आहे. असे जेव्हा पूर्वी विचारले जायचे तेव्हा, नेहरु, सुभाषचंद्र बोस किंवा महात्मा गांधी जशी उत्तरे दिली जायची. परंतु महाराष्ट्रात तुम्हाला आदर्श शोधण्याची गरज नाही कारण इथे खूप आदर्श आहेत. छत्रपती हे जुन्या काळातील आदर्श आहेत तर डॉ. आंबेडकर व गडकरी हे नव्या काळातील आदर्श आहेत असे ते म्हणाले. डॉ. आंबेडकर व गडकरी यांची तुलना छत्रपती शिवाजी महाराज यांच्या बरोबरीची कधीच होऊ शकत नाही. छत्रपती शिवाजी महाराज काय होते किंवा त्यांचे कर्तृत्व काय होते हे जाणून घेण्यासाठी त्यांच्या चरित्राचा आपल्याला अभ्यास करावा लागेल. राज्यपाल महोदय, शत्रूनेसुद्धा स्तुती करावी असे आमुचे छत्रपती शिवाजी महाराज होते, हे आपल्याला कधी समजणार?**

छत्रपती शिवाजी महाराज हे महाराष्ट्राची अस्मिता आहेत. महाराष्ट्रातील मराठी मनाचा मानबिंदू आहेत आणि केवळ महाराष्ट्राचाच नव्हे तर संपूर्ण हिंन्दुस्थानचे मानबिंदू आहेत. असे असताना कोणी त्यांचा उल्लेख एकेरी कसा काय करु शकते! छत्रपती शिवाजी महाराज हे कोणत्याही राजकीय पक्षाचा किंवा राजकारणाचा विषय मुळीच नाहीत. महाराष्ट्र ही छत्रपती शिवाजी महाराजांची जन्मभूमी तसेच कर्मभूमी असल्याकारणाने महाराष्ट्रातील जनता असली वक्तव्ये कधीही खपवून घेणार नाही. त्यामुळेच आज संपूर्ण महाराष्ट्रातून त्यांच्या वक्तव्याचा निषेध केला जात आहे. त्याचबरोबर छत्रपती संभाजीराजे, उदयनराजे, शिवेंद्रराजे यांनी तसेच महाविकास आघाडीने सुद्धा राज्यपालांच्या वक्तव्याचा निषेध केला. आज राज्यपाल देशातील जनतेच्या टिकेचा विषय बनले आहेत. मात्र देवेंद्र फडणवीस त्यांची पाठराखण करत आहेत. काल आज आणि उद्याही हिमालयाच्या मदतीला धावून जाणाऱ्या 'सह्याद्रीची प्रेरणा' छत्रपती शिवाजी महाराज होते आणि अखंड राहतील.



या अगोदरही महाराष्ट्र राज्याचा अपमान करण्याच्या हेतूने महाराष्ट्रातून विशेष करुन मुंबई व ठाण्यातून गुजराती तसेच राजस्थानी लोकांना काढून टाकले तर तुमच्याकडे पैसेच उरणार नाहीत. असे वक्तव्य केले होते. मुळात मुंबई महाराष्ट्राची आहे. संयुक्त महाराष्ट्राची आहे. संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यात 106 जणांनी प्राणांची हुतात्मी देऊन मुंबई महाराष्ट्राला मिळवून दिली. मुंबई ही मराठी माणसांची आहे, असे अभिमानाने सांगितले जाते. याचा विसर राज्यपालांना पडला असेल. मात्र महाराष्ट्र हे कसे विसरेल. फेब्रुवारी 2022 मध्येही राज्यपाल कोश्यारी यांनी छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल चुकीचे वक्तव्य केले होते. चाणक्याशिवाय चंद्रगुप्ताला कोण विचारेल? समर्थांशिवाय शिवाजीला कोण विचारेल? शिवाजीला किंवा चंद्रगुप्ताला छोटे नाही म्हणत पण गुरुंचे समाजात मोठं स्थान आहे. म्हणजेच छत्रपती शिवाजी महाराजांनी गुरूंचा आशीर्वादाने इतिहास घडविला होता काय ?

छत्रपती शिवाजी महाराजांनी लहान वयातच स्वराज्याची मुहुर्तमेढ रोवली होती. समर्थांची व छत्रपतींची भेट उशिरा झाली होती. त्यांचा गुरु राजमाता जिजाऊ होत्या. त्यांनीच छत्रपतींना घडवले होते.महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल या नात्याने निष्ठापूर्वक महाराष्ट्रातील जनतेची सेवा व कल्याण केले पाहिजे. राज्याचे कार्यपालन करण्यासाठी राज्यपालाची नियुक्ती केली जाते. संविधान कायदा जतन व संरक्षणाचे कामकाज हाती घेण्याचे सोडून बौद्धीक दिवाळखोर वक्तव्य करुन चर्चेत राहण्याचे कार्य राज्यपाल करत आहेत.

राज्यपाल भगतसिंग कोश्यारी यांनी आरएसएसचे दिग्गज तसेच भाजपचे राष्ट्रीय उपाध्यक्ष म्हणून तसेच उत्तराखंडचे मुख्यमंत्री म्हणूनही कामकाज केलेले आहे. तसेच त्यांनी गोवा राज्याचे राज्यपाल म्हणूनही कामकाज केले आहे. अशा अनुभवी व्यक्तीने असे चुकीचे वक्तव्य करणे निंदनीय आहे.

राज्याचे राज्यपाल म्हणून निपक्ष कामकाज केले पाहिजे. राज्यपाल कोश्यारी यांची सप्टेंबर. 2019 मध्ये महाराष्ट्राचे राज्यपाल म्हणून नेमणूक करण्यात आली. त्यावेळी सत्तेत महाविकास आघाडी सरकार असल्याकारणामुळेच त्यांची नियुक्ती महाराष्ट्र राज्यात केली असावी. पक्षपातीपणामुळे महाविकास आघाडी व राज्यपाल असा संघर्ष महाराष्ट्रातील जनतेने अनुभवला आहे. त्यामुळेच उपमुख्यमंत्री यांनी त्यांच्या वक्तव्याचे पाठराखन केले असावे.

## संपादकीय »

### जनांचा प्रवाहो चालला...

***वर्धमान ते ते चाले मार्ग रे क्षयाचा' हा कविवर्य गदिमांनी सांगितलेला सृष्टीचा नियम सर्वच बाबतीत लागू होतो, तो जगातील लोकसंख्यावाढीलाही लागू होणारच आहे.***

त्यामुळे, जागतिक लोकसंख्येने मंगळवारी आठ अब्ज हा आकडा गाठला असला तरी दहा अब्जांचा आकडा गाठल्यावर लोकसंख्या कमी होण्यास सुरुवात होईल अशी अटकळही या विषयातील तज्ज्ञ बांधत आहेत. परंतु आणखी दोन अब्जांची वाढ होऊन लोकसंख्यवाढ उताराला लागेल त्याला अद्याप बराच अवकाश आहे. भारत आणि चीन या दोन्ही देशांतील लोकसंख्यावाढीचा वेग आताच मंदावला असला तरी तो भारतापेक्षा चीनमध्ये अधिक कमी झाला आहे. लवकरच भारत लोकसंख्येत चीनला मागे टाकणार असल्याचे भाकितही संयुक्त राष्ट्राने वर्तवले आहे. लोकसंख्यावाढ रोखण्यासाठीचे सर्व प्रयत्न बंद करुन चीन आता उलट दिशेला लागलेला आहे. आजवरची लोकसंख्यावाढ लक्षात घेतली तर एका अब्जाने वाढ होण्यास १२ वर्षे लागत होती, त्याऐवजी आता १४ वर्षे लागतील असे म्हटले जात आहे.

## आमची 'शर्म अल् वाडी'

**हवामान या विषयात आम्हाला 'आज काय उकडतंय नाई,' 'ये रे ये रे पावसा...' किंवा 'वॉव, कस्सली थंडी पडलीय सध्या...'**

यापलीकडे काडीचीही गती नाही. मात्र, जगभरात हा फारच चर्चेचा आणि काळजीचा विषय व्हायला लागला आहे. नुकत्याच झालेल्या हवामान परिषदेचं ठिकाण ऐकल्यावर तर हा 'शर्म'चाही विषय आहे की काय, असे वाटून जरा चिंता वाटली. मात्र, 'शर्म अल् शेख' हे एखाद्या अरबी उद्योगपतीसारखं वाटणारं नाव म्हणजे इजिप्तमधलं प्रसिद्ध पर्यटनस्थळ आहे, हे समजल्यावर मनातली कालवाकालव जरा थांबली. बाकी इजिप्त म्हटलं, की सुएझ कालवा, पिरॅमिड, ममी व नाइल यापलीकडं पाचवी गोष्ट आम्हाला पटकन आठवत नाही. असो. हे जरा विषयांतर झालं; पण हवापाण्याच्या गप्पा या अशाच असतात. गावाकडं पारावर याचा अनुभव पूर्वी येत असे. 'यंदा पावसाचं काही चिन्ह दिसेना राव' या वाक्यापासून सुरू होऊन, जोडीला तंबाखूची चंची पुढं करून, दोन 'पावण्यां'च्या सुरू झालेल्या गप्पा सोयरिकीची बैठक करूनच उठल्याच्या वदंता आहेत.




शर्म अल् शेख येथेही पारावर नसल्या, तरी जगाच्या 'पाऱ्या'वर गप्पा रंगल्याचं समजलं. विविध कारणांमुळं आपल्या पृथ्वीमातेचा पारा चढत असल्याचं, सर्वांनी आपापला पारा वर न चढवता, मान्य केलं ते एक बरं झालं. आता कुणाच्या घरी जास्त चुली आणि कुणामुळं गावात जास्त धूर होतोय, यावर चर्चा घसरणार हे आलंच. कुणाच्या गढीवर आणि कुणाच्या वाड्यातून जादा धूर येतोय हे सगळ्यांनाच माहिती होतं; पण या तालेवार मंडळींची चूल बंद करायची तरी कशी, हा मुद्दा आला. मग आता गढीवाल्यांनी आणि वाड्यातल्या लोकांनी इतर गोरगरीब लोकांसाठीही रांधावं, असं ठरवण्यात आलं. थोडक्यात, गरिबांनी सरपण जाळू नये; ते काम करायला तालेवार मंडळी सक्षम आहेत, असा एक दणदणीत संदेश गावात दवंडीद्वारे पिटण्यात आला. आता आपल्याला आयतं रांधलेलं मिळणार, म्हणून गरिबांच्या कुडाच्या झोपड्यांत आनंद पसरला, तोवर या जेवणाचे पैसे कुणी द्यायचे यावरून बड्या मंडळींत धुसफूस सुरू झाल्याची चर्चा कानावर आली. गावजेवण तर घालायचंच, मोठेपणा तर सोडायचा नाही; पण खर्चही पावण्याच्या खिशातून झाला तर बरा, असा विचार गढीवर आणि वाड्यावर सुरू झाला. अगदी पावणा नाहीच गावला, तर सरकारच्याच गळ्यात हे खर्चापाण्याचं टाकता येईल का, यावरही बड्या मंडळींचा खल झाला.शकतो इतके ते धोकादायक आहे. कुडाच्या झोपड्या आणि लिंपलेल्या घरांतील मंडळी आपली बावरून बसली आणि इकडून तिकडं अन् तिकडून इकडं लगालगा मीटिंगांसाठी जाणाऱ्या कारकून मंडळींकडं टकामका बघत बसली.

## ।। अभंगवाणी ।।



एका जिवें आतां जिणें जालें दोहीं ।
वेगळीक कांहीं नव्हे आतां ॥१॥
नारायणा आम्हां नाहीं वेगळीक ।
पुरविली हे भाक सांभाळिली ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

## शॉर्ट न्यूज

### कर्ज देणाऱ्या ॲपच्या माध्यमातून तरुणाची बदनामी

। मुंबई । महाईन्यूज ।

कर्ज उपलब्ध करून देणाऱ्या ॲपच्या माध्यमातून ग्राफिक डिझायनर तरुणाचे अश्लील छायाचित्र प्रसारित करून बदनामी केल्याचा प्रकार मालाड परिसरात घडला आहे. याप्रकरणी कुरार पोलिसांनी अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा नोंदवून तपासाला सुरुवात केली आहे. या गुन्ह्यांचा संमातर तपास सायबर पोलीसही करीत आहेत. मालाड येथे राहणारा २८ वर्षांचा तक्रारदार तरुण ग्राफिक डिझायनर म्हणून काम करतो. काही दिवसांपूर्वी त्याला पैशांची गरज होती. त्यामुळे त्याने फेसबुकवरील ॲपवर कर्जाबाबत विचारणा केली. त्यावेळी त्याच्याकडे वयक्तीत माहिती मागवण्यात आली. तसेच छायाचित्रेही मागण्यात आले. त्यानंतर तात्काळ त्याचे कर्ज मंजूर करून त्याच्या बँक खात्यावर रक्कम हस्तांतरित करण्यात आली. कालांतराने ती रक्कम त्याने व्याजासहीत परतही केली होती.

# उद्धव ठाकरेंकडून महाराष्ट्र बंदचे संकेत!

## केंद्राने महाराष्ट्रात पाठवलेले सॅम्पल घरी पाठवा अन्यथा...”

। मुंबई। महाईन्यूज ।

राज्यपाल भगतसिंह कोश्यारींना हटवलं नाहीतर महाराष्ट्र प्रेमींनी एकत्र येऊन विरोध केला पाहिजे. असंच चालत राहिलं, तर आपल्या शूरवीर राज्याच्या अब्रूची लक्तरे वेशीवर टांगली जातील. आपल्याला फक्त मग बघत बसावे लागले. त्यामुळे सर्वांनी एकत्र येऊन महाराष्ट्र द्रोह्यांना इंगा दाखवला पाहिजे. वेळ आली तर महाराष्ट्र बंद करण्याचं देखील पाहू,



असा इशारा शिवसेना पक्ष प्रमुख उद्धव ठाकरेंनी दिला आहे.

“भाजपातील महाराष्ट्रातील प्रेमींनी बरोबर यावे. कारण पक्षीय राजकारणात अस्मिता आणि राज्य चिरडलं जात असेल, तर आपण छत्रपतींचे नाव घेण्यास नालायक आहोत. दोन चार दिवसांत सर्वांना एकत्र येण्याचे आवाहन करत आहे.

केंद्राने महाराष्ट्रात पाठवलेले सॅम्पल घरी पाठवावे, अन्यथा चांगलं वृद्धाश्रम असेल तिकडे पाठवा,” असे उद्धव ठाकरे यांनी म्हटलं.

“महाराष्ट्र छत्रपती शिवाजी महाराजांना मानतो. पण, त्यांचा अपमान झाल्यावर भाजपाकडून गुळगुळीत प्रतिक्रिया दिल्या जातात. केंद्रात ज्यांचं सरकार आहे, त्यांच्या विचारांची माणसं राज्यपाल म्हणून नेमली जातात.

या माणसांची कुवत काय असते, यांची पात्रता काय असते? यांना वृद्धाश्रमातही जागा मिळत नाही. त्यांना राज्यपाल म्हणून नेमलं जातं का? आपल्या राज्यपालांना राज्यपाल म्हणणे मी सोडून दिलं आहे,” असा घणाघातही उद्धव ठाकरेंनी केली आहे.

### “सत्तेच्या खुर्चीसाठी तुम्ही बाळासाहेबांचे विचार मोडले, हिंदुत्वाचे विचार सोडले आणि... ”-मुख्यमंत्री शिंदे

**मुंबई** : राज्यपाल भगतसिंह कोश्यारी आणि भाजपा प्रवक्ते सुधांशु त्रिवेदींनी छत्रपती शिवाजी महाराजांबाबत केलेल्या वक्तव्यांमुळे राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. हा मुद्दा महाविकास आघाडीच्या नेत्यांनी उचलून धरला असून, भाजपा आणि मुख्यमंत्री शिंदेवर जोरदार टीका सुरू आहे. याशिवाय शिवरायांचा अपमान करणाऱ्यांसोबत न राहता मुख्यमंत्री शिंदेंनी सत्तेतून बाहेर पडलं पाहिजे, असंही वारंवार म्हटलं जात आहे. या सर्व घडामोडींच्या पार्श्वभूमीवर आज शिवसेना(उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी पत्रकारपरिषदेत घेत भूमिका मांडताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर टीका केली. त्यांच्या टीकेला मुख्यमंत्री शिंदेंकडून प्रत्युत्तर देण्यात आलं.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, “या राज्यात महाराष्ट्राचं आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराजांची तुलना कुणाशीही होऊ शकत नाही. त्यामुळे मी यापूर्वीही माझं मत मांडलेलं आहे आणि आता जे काय सुरू आहे, गेली चार-पाच महिन्यांमध्ये जे काय आमचं खऱ्या अर्थाने बाळासाहेबांच्या विचाराचं शिवसेना-भाजपा युतीचं सरकार काम करतय, त्यामुळे विरोधकांच्या पायाखालची वाळू सरकली आहे, धडकी भरली आहे की आता काय होणार पुढे? आणि सगळे जे काय प्रकार आहेत, ते त्यातूनच पुढे येत आहेत.”

# ‘मराठवाडा, विदर्भ स्वतंत्र राज्ये करा’, गुणरत्न सदावर्ते यांची मागणी!

।अमरावती। महाईन्यूज ।

कर्नाटकचे मुख्यमंत्री बसवराज बोम्मई यांनी जत तालुक्यातील ४० गावांसदर्भात मोठे विधान केले आहे. या ४० गावांनी कर्नाटकमध्ये सामील होण्याची इच्छा व्यक्त केली असून त्यांनी तसा ठराव केलेला आहे, असे बोम्मई म्हणाले आहेत. बोम्मई यांच्या याच विधानानंतर राज्यातील राजकीय नेते आक्रमक झाले आहेत. उद्धव ठाकरे गट, राष्ट्रवादी आणि काँग्रेस पक्षाकडून सत्ताधारी शिंदे गट- भाजपावर सडकून टीका केली जात आहे. तर महाराष्ट्राचे एकही गाव कर्नाटकमध्ये जाणार नाही, असे आश्वासन सत्ताधाऱ्यांकडून दिले जात आहे. बोम्मई यांच्या या विधानामुळे राज्यात संताप व्यक्त केला जात असताना आता ॲड. गुणरत्न सदावर्ते विदर्भ आणि मराठवाडा अशी दोन वेगळी राज्ये निर्माण करावीत, अशी मोठी मागणी केली आहे. तसेच याच मागणीसंदर्भात आगामी रणनीती ठरवण्यासाठी शुक्रवारी (२५ नोव्हेंबर) संवाद परिषदेचे आयोजन करण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले. “मराठवाडा आणि विदर्भ ही वेगळी



राज्ये निर्माण झाली पाहिजेत. त्यांचा कारभार स्वातंत्रपणे चालला पाहिजे. या भागातील मानवी विकासासाठी तसेच मागासलेपण संपवण्यासाठी मराठवाडा, विदर्भ ही नवी राज्ये निर्माण झाली पाहिजेत,” अशी मागणी सदावर्ते यांनी केली. तसेच याच मागणीला घेऊन उद्या (२४ नोव्हेंबर) उस्मानाबाद येथे मोठी संवाद परिषद आयोजित करण्यात आली आहे. आमची मागणी सरकार दरबारी पोहोचवण्यासाठी या परिषदेचे आयोजन करण्यात येणार आहे, अशी माहितीही त्यांनी दिली. “या परिषदेला सर्व जाती-धर्माचे लोक येणार आहेत. परिषदेसाठी विद्यार्थी, वकील, शिक्षक, महिला उपस्थित राहणार आहेत. स्वतंत्र मराठवाडा व्हावा या एका भावनेतून हे सगळे जमा होतील. आमची स्वतंत्र मराठवाडा झाला पाहिजे, ही मागणी आहे.

# बोम्मईंच्या विधानाविरूध्द सोलापूर, अक्कलकोटमध्ये संताप

## अक्कलकोट तालुक्यावर दावा

। सोलापूर । महाईन्यूज ।

वर्षानुवर्षे प्रलंबित असलेला महाराष्ट्र-कर्नाटक सीमावाद सर्वोच्च न्यायालयात असताना हा वाद अधुनमधून राजकीय पटलावर येतो. कर्नाटकचे मुख्यमंत्री बासवराज बोम्मई यांनी सांगली जिल्ह्यातील जत तालुक्यासह सोलापूर शहर आणि अक्कलकोट तालुक्यावर दावा केला आहे. त्यास सोलापूर व अक्कलकोटवासियांनी कडाडून विरोध करीत बोम्मई यांच्या विधानाचा निषेध केला आहे. महाराष्ट्र-कर्नाटक सीमेवर सोलापूर जिल्ह्यातील दक्षिण सोलापूर, अक्कलकोट, मंगळवेढा आदी तालुक्यांचा समावेश आहे. सीमावादावर यापूर्वी नेमलेल्या महाजन आयोगासमोर स्थानिक नागरिकांनी कर्नाटक प्रांतात समाविष्ट होण्यास स्पष्ट नकार दिला होता. दिवंगत सहकार नेते, माजी आमदार वि. गु. शिवदारे,



अक्कलकोटचे माजी आमदार बी. टी. माने, तत्कालीन जिल्हा स्थानिक स्वराज्य बोर्डाचे अध्यक्ष कल्लप्पा सोनकांबळे आदींनी महत्वाच्या साक्षी देताना महाराष्ट्रातच राहण्याचा निर्धार स्पष्ट केला होता. स्थानिक स्वराज्य संस्थांनी ठराव करून महाराष्ट्राच्या बाजूने कौल दिला होता. सध्या हा सीमावाद सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित आहे.तथापि, कर्नाटकचे मुख्यमंत्री बोम्मई यांनी जत तालुक्यातील गावे कर्नाटकात जोडण्याची मागणी केली असता इकडे त्यांच्याच भाजपचे असलेले उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जत तालुक्यातील एक इंचही जमीन कर्नाटकात जाऊ देणार नसल्याचे स्पष्ट केले आहे.

"

सोलापूर आणि अक्कलकोट कर्नाटकाला जोडण्याची मागणी कर्नाटकचे मुख्यमंत्री बसवराज बोम्मई यांनी केली असली तरी त्यांचे हे स्वप्न कदापि पूर्ण होणार नाही. त्यांनी हे स्वप्न पाहूही नये, अशा शब्दात अक्कलकोटचे भाजपचे आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी बोम्मई यांना आक्रमक पध्दतीने उत्तर दिले आहे. सोलापूर आणि अक्कलकोटचा बहुतांशी जनता कन्नड भाषक असली तरीही त्यांच्यापैकी एकानेही कर्नाटकात समाविष्ट होण्याची मागणी केली नाही. आम्ही सारेजण कन्नड भाषक असलो तरी महाराष्ट्र आमचा श्वास आहे. आमची संस्कृती महाराष्ट्रच आहे. आमच्या अनेकदा पिढ्या महाराष्ट्रात जन्मल्या आणि गेल्या. भविष्यकाळातही हीच परंपरा अखंडपणे चालत राहणार आहे. बेळगावसह निपाणी, भालकीमधून जनतेने कर्नाटकातून महाराष्ट्रात समाविष्ट होण्याची मागणी वारंवार केली आहे. तशी आम्हा कोणीही कर्नाटकात जाण्याची मागणी केली नाही, हे बोम्मई यांनी लक्षात घ्यावे, असे आमदार कल्याणशेट्टी यांनी नमूद केले आहे.

# फडणवीसांचं वक्तव्य चिथावणीखोर, त्यांचं स्वप्न पूर्ण होणारच नाही!

## कर्नाटकचे मुख्यमंत्री बसवराज बोम्माई यांची टीका




**। नवी दिल्ली । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**कर्नाटक आणि महाराष्ट्रातील सीमावाद आता टोकाला पोहोचला आहे. दोन्ही राज्यात भाजपाची सत्ता असल्याने राज्यातील विरोधी पक्षाने हा मुद्दा उचलून धरलाय. दरम्यान, महाराष्ट्रातील एकही गाव दुसऱ्या राज्यात जाऊ देणार नाही, असं स्पष्टीकरण उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी महाराष्ट्रावासीयांना दिलं. मात्र, यावरून कर्नाटकचे मुख्यमंत्री बसवराज बोम्मई यांनी देवेंद्र फडणवीसांवरच टीका केली आहे. कर्नाटक-महाराष्ट्र सीमाप्रश्नावर महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी चिथावणीखोर वक्तव्य केलं.**

परंतु, त्यांचं स्वप्न कधीच पूर्ण होणार नाही, असं बसवराज बोम्माई यांनी म्हटलंय. जतमधील गावांचा ठराव २०१२ मध्ये झाला होता. आता याबाबत कोणताही ठराव झालेला नाही. हे शत्रुत्व नाही, कायदेशीर लढाई आहे. एकही गाव महाराष्ट्रातून कुठेही जाणार नाही. उलट सीमाभागातील गावं आम्ही मिळवण्याचा प्रयत्न करणार आहोत, असं देवेंद्र फडणवीस म्हणाले होते. त्यांच्या याच वक्तव्याला बसवराज यांनी चिथावणीखोर वक्तव्य म्हटलं आहे. सोलापुरातील कन्नड भाषिक गावांना कर्नाटकात सामील करण्यात येण्याचा प्रस्ताव बसवराज बोम्माई यांनी ठेवला आहे. २०१२ ला कर्नाटकात जत तालुक्यात ही गावे यावीत अशी मागणी होती.

### अजित पवारांची टीका

**कर्नाटकच्या मुख्यमंत्र्यांनी काल सांगली जिल्ह्यातील जत तालुक्यावर दावा केला होता. आज त्यांनी सोलापूर जिल्ह्यातील अक्कलकोट तालुक्यातील गावाबाबत वक्तव्य केलं आहे. महाराष्ट्राची मुंबईच मागायची राहिली आहे की काय कळत नाही, अशा शेलक्या शब्दांत माजी उपमुख्यमंत्री आणि विधानसभेचे विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी टीका केली आहे. महाराष्ट्र असातसा वाटला का तुम्हाला? आता सोलापूर जिल्ह्यातील अक्कलकोट गावबाबत वक्तव्य केलं. काहीही संबंध नसताना अशाप्रकारचे वक्तव्ये करून लोकांचं लक्ष विचलीत करण्याचं काम सुरू आहे. मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांनी याबाबत कडक भाषेत प्रत्युत्तर दिलं पाहिजे. याआधी अशी वक्तव्ये होत नव्हती.**

### दिल्लीतील नायब राज्यपालांच्या विनंतीनंतर

## जामा मशीद प्रशासनाकडून 'तो' वादग्रस्त निर्णय अखेर मागे

**। नवी दिल्ली।महाईन्यूज । वृत्तसंस्था ।**

दिल्लीच्या जामा मशिदीमध्ये महिलांनी प्रवेश करू नये, असा वादग्रस्त निर्णय मशीद प्रशासनाकडून घेण्यात आला होता. या निर्णयानंतर विविध स्तरावरून तीव्र प्रतिक्रिया उटमत असताना दिल्लीचे नायब राज्यपाल वी.के. सक्सेना यांनी केलेल्या विनंतीनंतर मशीद प्रशासनाकडून हा निर्णय मागे घेण्यात आल्याची माहिती शाही इमाम सय्यद अहमद बुखारी यांनी दिली आहे. मशीद परिसरात काही अयोग्य कृत्ये निदर्शनास आल्यानंतर आम्ही महिलांना प्रवेश बंदीचा निर्णय घेतला होता. मात्र, नमाज अदा करण्यासाठी आलेल्यांवर कोणतीही बंद घालण्यात आली नव्हती. काही वेळापूर्वीच आम्ही २० ते २५ मुलींच्या गटाने जामा मशीद परिसराला भेट दिली. आम्ही त्यांना प्रवेशही दिला", अशी प्रतिक्रिया शाही इमाम सय्यद अहमद बुखारी यांनी दिली. "या निर्णयामुळे वाद झाल्यानंतर दिल्लीचे नायब राज्यपाल वी.के. सक्सेना यांच्याशी माझी चर्चा झाली. त्यांच्या विनंतीनंतर आम्ही हा निर्णय मागे घेतला आहे. मशीद परिसरात लावण्यात आलेले बोर्डही काढण्यात आले आहेत. मात्र, मशिदीला भेट देताना सर्वांना नियम पाळावे लागतील", असेही ते म्हणाले.



# अभिनेत्री रिचा चड्ढाच्या पोस्टमुळे नवा वाद !

## शहीदांचा अपमान केल्याचा होतोय आरोप

**।नवी दिल्ली । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।**

अभिनेत्री रिचा चड्ढाने सोशल नेटवर्किंगवर केलेल्या एका पोस्टमुळे नवीन वादाला तोंड फुटलं आहे. ट्विटरवरुन रिचाने एक रिप्लाय देताना 'गलवान' असा उल्लेख करत भारतीय लष्कराचा अपमान केल्याचा दावा केला जात आहे. भारतीय लष्करातील उत्तर विभागाचे लेफ्टनंट जनरल उपेंद्र द्विवेदी यांनी केलेल्या विधानावर प्रतिक्रिया देताना रिचाने हे ट्वीट केलं आहे. भारत सरकारने आदेश दिल्यास पाकव्याप्त काश्मीर भारताला जोडण्यासाठी भारतीय सैन्य तयार आहे, असं द्विवेदी म्हणाले होते. याच प्रतिक्रियेसंदर्भातील ट्वीट रिचाने रिट्वीट करत, "गलवान सेज हाय" म्हणजेच गलवान तुमच्याकडे पाहतंय अशा अर्थाची प्रतिक्रिया दिली आहे.

मंगळवारी आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेमध्ये द्विवेदी यांनी, "पाकव्याप्त काश्मीर भारताला



जोडण्याबाबतचा प्रस्ताव संसदेत पाठवला आहे," असा उल्लेख करत पाकिस्तान व्याप्त काश्मीरबद्दल विधान केलं. "हा संसदेतील प्रस्ताव एक भाग झाला, आता उरला प्रश्न भारतीय सैन्यांचा तर भारत सरकारने दिलेला कोणताही आदेश अमलात आणण्यासाठी भारतीय सैन्य तयार आहे. जेव्हा याबाबतचा आदेश दिला जाईल, तेव्हा आम्ही पूर्ण तयारीने पुढे जाऊ," असं विधान उपेंद्र द्विवेदी यांनी पाकव्याप्त काश्मीरसंदर्भात बोलताना केलं. याच विधानातील मजकुरासहीत द्विवेदी यांचा फोटो एका ट्विटर हॅण्डलवरुन पोस्ट करण्यात आला होता. हा फोटो रिट्वीट करत रिचाने, "गलवान सेज हाय" असं म्हटलं आहे. या ट्वीटवरुन बराच वाद निर्माण झाला आहे. अनेकांनी या ट्वीटवरुन रिचाला फटकारलं आहे.

# "सर्व लोकशाही मार्ग बंद झाले आहेत", मध्य प्रदेशात राहुल गांधींचं विधान

## आरएसएस, भाजपावर राहुल गांधींचा गंभीर आरोप

**। नवी दिल्ली । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।**

**काँग्रेस खासदार राहुल गांधी यांनी मध्य प्रदेशात 'भारत जोडो' यात्रेदरम्यान भाजपावर हल्लाबोल केला आहे. "सर्व लोकशाही मार्ग बंद झाल्याने आम्ही 'भारत जोडो' यात्रा सुरू केली आहे. लोकसभा, निवडणुकीचा मार्ग, माध्यमं सर्व बंद आहेत. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, भाजपाने या सर्व संस्थांना वेठीस धरलं आहे. न्यायव्यवस्था, न्यायालयं दबावात आहे. त्यामुळे आम्हाला वाटलं की आता एकच पर्याय आहे. रस्त्यावर उतरुन लोकांच्या, शेतकऱ्यांच्या समस्या जाणून घ्यायच्या.**



मजूर, छोटे व्यापारी यांच्यात सामील व्हावं", असं राहुल गांधींनी म्हटलं आहे. २०२० मध्ये काँग्रेसला मध्य प्रदेशात मोठा फटका बसला होता. काँग्रेसमधील तत्कालीन नेते ज्योतिरादित्य सिंधिया यांनी २० निष्ठावंतांसोबत भाजपात प्रवेश केल्यानंतर काँग्रेस सरकार कोसळलं होतं. यावेळी घोडेबाजार झाल्याचा आरोप करत गांधी यांनी भाजपावर सडकून टीका केली आहे. "आम्ही मध्य प्रदेशात निवडणूक जिंकलो होतो. तेथे आमचं सरकार होतं. मात्र, त्यांनी (भाजपा) २० ते २५ भ्रष्टाचारी आमदारांना कोट्यावधी रुपये देत खरेदी केले आणि सरकार स्थापन केलं", असा आरोप बुऱ्हानपूर येथील सभेत राहुल गांधींनी केला आहे.

राहुल गांधीच्या नेतृत्वाखाली काँग्रेसने कन्याकुमारी ते श्रीनगर अशी ३ हजार ५७० किलोमीटरची पदयात्रा काढली आहे. महाराष्ट्रातून ही यात्रा बुधवारी सकाळी मध्य प्रदेशातील बोदारली गावात दाखल झाली. या गावाचं नेहरु-गांधी कुटुंबाशी ऐतिहासिक नातं आहे. दिवंगत माजी पंतप्रधान इंदिरा गांधी, राजीव गांधी आणि काँग्रेस नेत्या सोनिया गांधी यांनी अनेकदा या भागाला भेट दिली आहे. मध्य प्रदेशात आगामी वर्षात विधानसभा निवडणूक होणार आहे. त्यादृष्टीने राहुल गांधींची ही पदयात्रा अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे. पदयात्रेच्या वाटेतील पाच लोकसभा मतदारसंघ आणि २६ विधानसभा जागांवर प्रभाव निर्माण करण्याच्या प्रयत्नात काँग्रेस आहे. विधानसभेच्या दोन जागा वगळता सर्व जागांवर भाजपाचे वर्चस्व आहे.

# आलिया भट्टची घोडदौड सुरूच

आलियाने 'स्टुडन्ट ऑफ द इयर' या चित्रपटातून पदार्पण केले



बॉलिवूडमधील लोकप्रिय कपल आलिया भट्ट व रणबीर कपूर नुकतेच आई-बाबा झाले. ६ नोव्हेंबरला आलियाने तिच्या गोंडस मुलीला जन्म दिला. कन्येच्या आगमनाने कपूर कुटुंबियांतही आनंदाचे वातावरण आहे. आलिया भट्ट आता एका मुलीची आई असली तरी तिने चित्रपटसृष्टी सोडली नाही. तिच्याकडे बॉलिवूडचं नव्हे तर हॉलीवूडच्या चित्रपटात ती झळकणार आहे. मात्र आलियाच्याबाबतीत एक मोठी बातमी समोर आली आहे.

बॉलिवूड, हॉलिवूडनंतर आता आलिया भट्टला आता जपानी चित्रपटात काम करायचे आहे. मॅरी क्लेअरशी नुकत्याच झालेल्या संवादामध्ये तिने हा खुलासा केला आहे. तीच असं म्हणणं आहे की तिला आता जागतिक चित्रपटांमध्ये काम करायचे आहे जेणेकरून तिचा अभिनय आणखीन समृद्ध होईल. म्हणूनच तिला हॉलिवूडनंतर आता जपानी चित्रपटात काम करायचे आहे. आलिया भट्ट पुढे म्हणाली “मला स्वतःला एका साच्यात ठेवायचे नाही. मला जेवढं शक्य आहे तितकं मी एक्स्प्लोर करणार आहे. केवळ हॉलिवुड चित्रपटात काम करणे अथवा जो येईल कुठून ही आलेला आशयात मला काम करायचे नाही. स्वतःला सतत आव्हान देत राहणे आणि अस्वस्थ करणाऱ्या भूमिका साकारात राहणे अशी माझी कल्पना आहे. जर मला भाषा कशी बोलायची हे कळल्यास मी पहिला चित्रपट जपानी भाषेतला करेन. मला स्वतःला कंटाळा येऊन नये म्हणून मी स्वतःला सतत प्रेरित करत असते.”

आलिया भट्ट नुकतीच आपल्या पतीबरोबर ‘ब्रह्मास्त्र’ चित्रपटात झळकली होती. या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर चांगली कमाई केली होती. तसेच तिने दाक्षिणात्य चित्रपटसृष्टीत पाऊल ठेवलं आहे. राजामौली यांच्या ‘आरआरआर’ या चित्रपटात तिने काम केले होते. आलियाने काही वर्षातच आपल्या अभिनयाने प्रेक्षकांची मन जिंकली आहेत. आलियाने ‘स्टुडन्ट ऑफ द इयर’ या चित्रपटातून पदार्पण केले. त्यानंतर ‘हम्पी शर्मा की दुलहनिया’, ‘कपूर अँड सन्स, गंगुबाई’ यांसारखे वेगवेगळ्या धाटणीचे चित्रपट तिने केले आहेत. आलिया आता झोया अख्तरच्या आगामी चित्रपटात झळकणार आहे तर हॉलिवूडच्या ‘हार्ट ऑफ स्टोन’ या चित्रपटात ती काम करणार आहे.

# तापसी पन्नूची नवी इनिंग, अभिनेत्री दिसणार नव्या भूमिकेत

अभिनेत्री तापसी पन्नू तिच्या वादग्रस्त वक्तव्यामुळे सोशल मीडियावर चांगलीच चर्चेत असते. तिच्या अभिनयाची लोक प्रशंसा करतात, पण तिच्या वादग्रस्त वक्तव्यामुळे तिला बरंच ट्रोलही केलं जातं. तापसीचा आगामी चित्रपट आता थेट ओटीटीवर प्रदर्शित होणार असल्याची बातमी समोर आली आहे. सोशल मीडिया अकाऊंटच्या माध्यमातून तापसीने ही गोष्ट शेअर केली आहे.

तापसीचा आगामी चित्रपट ‘ब्लर’ हा चित्रपटगृहाऐवजी थेट ‘झी ५’ या ओटीटी प्लॅटफॉर्मवर प्रदर्शित होणार असल्याचं तापसीने स्पष्ट केलं आहे. चित्रपटाचं एक पोस्टर शेअर करत तिने ही बातमी दिली आहे. तापसीचा हा चित्रपटही एक सस्पेन्स थ्रिलर असणार आहे हे पोस्टरवर स्पष्ट होत आहे. तापसीने शेअर केलेलं पोस्टर पाहून तिचे चाहते चांगलेच उत्सुक झाले आहेत. तापसीच्या या चित्रपटाला सोशल मीडियावर लोकांनी शुभेच्छा दिल्या आहेत. शिवाय या चित्रपटातून तापसी प्रथमच निर्मिती क्षेत्रात पदार्पण करणार आहे. तापसी पन्नू मध्यंतरी ‘दोबारा’ या चित्रपटात झळकली. याचं दिग्दर्शन अनुराग कश्यपने केलं होतं. हा



चित्रपट बॉक्स ऑफिसवर सपशेल आपटला होता. या चित्रपटादरम्यान अनुराग आणि तापसीच्या वादग्रस्त वक्तव्यामुळे हा चित्रपट फ्लॉप ठरला होता.

तापसीच्या या आगामी चित्रपटासाठी प्रेक्षक चांगलेच उत्सुक आहेत.

# अरुंधती-आशुतोषच्या नात्यात वादळ?

स्टार प्रवाहवरील आई कुठे काय करते मालिकेचं कथानक अतिशय उत्कंठावर्धक वळणावर येऊन पोहोचलं आहे. आशुतोषच्या वाढदिवशी अरुंधती आशुतोषच्या बाबतीतला सर्वात मोठा निर्णय घेणार होती. म्हणजेच ती त्याल मनातल्या भावना सांगणार होती. पण आता मालिकेत मोठा ट्विस्ट आला आहे. मालिकेत अनुष्काची एण्ट्री झाली असून आता अरुंधतीला तिच्या निर्णयावर पुन्हा विचार करावा लागणार आहे.फराह



चांगल्या मैत्रिणि आहेत. अनुष्का म्हणजेच आशुतोषची खूप जुनी मैत्रीण. बऱ्याच वर्षांनंतर या दोघांची पुन्हा भेट होणार आहे. सुप्रसिद्ध अभिनेत्री स्वरांगी मराठे अनुष्का ही व्यक्तिरेखा साकारणार आहे. अनुष्का या व्यक्तिरेखेबद्दल सांगताना स्वरांगी म्हणाली, ‘मी आई कुठे काय करते या मालिकेची खूप मोठी चाहती आहे. खऱ्या आयुष्यात मी दोन मुलांची आई असल्यामुळे आई काय काय करु शकते याचा अनुभव घेतच आहे. अश्यातच या भूमिकेसाठी विचारणा झाल्यावर क्षणाचाही विलंब न लावता मी होकार दिला.'

पुढे ती म्हणाली, 'घरच्यांची खंबीर साथ असेल तर कोणतीही गोष्ट अवघड नसते. गेले कित्येक दिवस स्वरांगी तू सध्या काय करतेस हा प्रश्न मला नेहमी विचारला जायचा. आता मी अभिमानाने सांगू इच्छिते की स्टार प्रवाहची लोकप्रिय मालिका आई कुठे काय करते मध्ये मी अनुष्का ही व्यक्तिरेखा साकारतेय. शूटिंगच्या पहिल्याच दिवशी यश म्हणजेच अभिनेता अभिषेक देशमुखने सेटवर सर्वांची ओळख करुन दिली. देशमुख कुटुंबाने मला सामावून घेतलं आहे. सेटवर खुपच सकारात्मक वातावरण आहे. त्यामुळेच काम करताना खूप मजा येतेय.

# रश्मिका मंदानाला पहिल्या चित्रपटासाठी मिळाले होते इतके मानधन


दाक्षिणात्य अभिनेत्री आणि नॅशनल क्रश अभिनेत्री रश्मिका मंदाना ही नेहमीच काही ना काही कारणांमुळे चर्चेत असते. रश्मिका ही गेल्या काही दिवसांपासून पुष्पा या तिच्या चित्रपटामुळे चर्चेत आहे. या चित्रपटानंतर ती दक्षिणेतील सर्वाधिक मानधन घेणाऱ्या अभिनेत्रींपैकी एक म्हणून ओळखली जाते. रश्मिका मंदाना ही लवकरच बॉलिवूडमध्ये पदार्पण करणार आहे. मिशन मजनू या चित्रपटाद्वारे रश्मिका ही बॉलिवूडमध्ये पदार्पण करणार आहे. पण नॅशनल क्रश म्हणून ओळखली जाणाऱ्या रश्मिकाने नुकतंच तिच्या पहिल्या पगाराबद्दल भाष्य केले आहे.

रश्मिका मंदनाने नुकतंच ‘दैनिक भास्कर’ला मुलाखत दिली. या मुलाखतीत तिने तिच्या वैयक्तिक आयुष्याबद्दल अनेक खुलासे केले. यात ती म्हणाली की, “मला कधीही अभिनेत्री व्हायचे नव्हते. मला माझ्या वडिलांचा व्यवसाय सांभाळायचा होता. पण त्यावेळी माझ्याकडे इतका आत्मविश्वास नव्हता की मी लोकांच्या नजरेला नजर देत त्यांच्याशी बोलू शकते. त्यामुळेच मी शिक्षण पूर्ण करून वडिलांच्या व्यवसायात हातभार लावणार याचा विचार केला होता.”



# “त्या रात्री घाट उतरत असताना....”

## मयुरी वाघने सांगितला अद्भुत किस्सा



झी मराठी वरच्या ‘अस्मिता’ या मालिकेने मयुरी वाघला ओळख मिळवून दिली. तिने या मालिकेत एका गुप्तहेराची साकारलेली भूमिका आबालवृद्धांना पसंत पडली होती. मयुरी सध्या आपल्याला एका मालिकेच्या प्रोमोमध्ये दिसत आहे. ती आता एका नव्या भूमिकेत आपल्यासमोर येत आहे. यावेळी तिची भूमिका थोडी वेगळी असणार आहे. मालिकेत ती आई एकविरेच्या रूपात दिसणार आहे.

काही दिवसांपूर्वी या मालिकेचा प्रोमो सोशल मीडियावर व्हायरल झाला होता. नुकतीच मालिकेतील कलाकार अमृता पवार, मयुरी वाघ या दोघीनी कार्ला येथे जाऊन आई एकविरेचे दर्शन घेतले. यावेळी तिने माध्यमांशी संवाद साधला. तेव्हा तिने तिला आलेल्या दैवी अनुभवाबद्दल सांगितले आहे. ती असं म्हणाली की “काही वर्षांपूर्वी मी माझ्या कुटुंबाबरोबर लवासा येथे गेले होते. तिथून पार्ट येत असताना आम्हाला उशीर झाला. घाटातून उतरत असताना तिथे लाईट्सदेखील नव्हते. आम्ही विचार करत होतो आता खाली उतरायचं, मात्र तेवढ्यात काही अंतरावर आम्हाला एक गाडी दिसली जी आम्हाला इंडिकेटर देत होती तिच्या आधारे आम्ही तो घाट उतरलो मात्र घाट उतरताच ती गाडी नाहीशी झाली. कदाचित त्यातील व्यक्ती निघून गेली असावी मात्र मी याला दैवी चमत्कार मानते.” अशा शब्दात त्यानो प्रतिक्रिया दिली.

## पेलेनंतर हा स्पॅनिश फुटबॉलपटू ठरला विश्वचषकात गोल करणारा सर्वात तरुण खेळाडू

**पुणे ।**
**महाईन्यूज । वृत्तसंस्था**



स्पेनने कोस्टा रिकाचा ७-० असा पराभव करून फिफा विश्वचषक २०२२ ची धमाकेदार सुरुवात केली. फेरान टॉरेसच्या दोन गोलमुळे स्पेनने ऐतिहासिक विजय मिळवला आहे. स्पेनचा विश्वचषक इतिहासातील सर्वात मोठा विजय. यापूर्वी २४ जून १९९८ रोजी त्याने बल्गेरियाचा ६-१ असा पराभव केला होता. हा सामना जिंकल्यानंतर स्पेनचा संघ जपानला मागे टाकत ग्रुप-ई मध्ये अव्वल स्थानी पोहोचला आहे. याच सामन्यात स्पेनचा मिडफिल्डर गॅवीने त्या सातपैकी एक गोल करत ब्राझीलच्या महान पेलेनंतरचा सर्वात तरुण विश्वचषक गोलकर्ता बनला.

१९५८च्या फिफा विश्वचषकातील ब्राझीलच्या महान खेळाडू पेलेनंतरचा सर्वात तरुण विश्वचषक गोलकर्ता बनला. १७व्या वर्षी पेलेने स्वीडनमध्ये ब्राझीलला पहिले विश्वचषक जिंकून दिले होते. त्या विश्वचषकात त्याने एकूण सहा गोल केले होते. १८ वर्षीय गॅवीने विश्वचषक स्पर्धेत गोल करणारा सर्वात तरुण स्पॅनिश खेळाडू बनल्यानंतर सामन्यातील सर्वात उत्कृष्ट खेळाडू (MOST VALUABLE PLAYER) असा पुरस्कारही मिळवला. गॅवीने २००६ विश्वचषकातील युक्रेनविरुद्ध गोल करणाऱ्या १९ वर्षीय सेस्क फॅब्रेगासचा विक्रम मोडला. गॅवीने सामन्यानंतर पत्रकार परिषदेत बोलताना भावना व्यक्त केल्या. तो म्हणाला, "मी या कामगिरीबद्दल आनंदी आहे. मला माझ्या गोलपेक्षा सर्वात जास्त काळजी होती ती सामन्याची, याचे कारण की आम्ही विश्वचषकातील पहिलाच सामना आणि त्यात परत मी पहिल्यांदाच एवढ्या मोठ्या स्पर्धेत खेळत आहे त्यामुळे काही चुका तर होणार नाहीत ना आम्ही सामना नाही जिंकलो तर पुढे कसे होईल हेच सर्व विचार माझ्या डोक्यात सुरु होते. मात्र आमच्या संघाने अफलातून खेळ करत तब्बल ७ गोल करून सामना खिशात घातला." त्याने केलेल्या गोलविषयी तो म्हणाला, "त्या ७ गोलमध्ये मी सुद्धा एक गोल करत संघासाठी खारीचा वाटा उचलला याचा मला आनंद आहे.

# टीम इंडियाचा 'द स्काय' अशी ओळख असणाऱ्या सूर्यकुमारला बांगलादेश दौऱ्यातून वगळले!

## आगामी बांगलादेश दौऱ्यासाठी बीसीसीआयने भारतीय संघाची कसोटी

**दोहा।**
**महाईन्यूज । वृत्तसंस्था**

**डिसेंबर महिन्यात भारतीय क्रिकेट संघ बांगलादेश दौऱ्यावर जाणार आहे. या छोटेखानी दौऱ्यावर भारतीय संघ तीन एकदिवसीय व दोन कसोटी सामन्यांच्या मालिका खेळणार आहे. या मालिकेसाठी भारतीय संघाची निवड काही दिवसांपूर्वी झाली होती. या संघात निवड झालेला अष्टपैलू रवींद्र जडेजा हा दुखापतीमुळे मालिकेतून बाहेर झाला आहे. त्यामुळे भारतीय संघात दोन नवीन नावांना संधी मिळाली. भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) याबाबतची अधिकृत घोषणा नुकतेच केली.**




टीम इंडियाचा आता उद्यापासून म्हणजेच २५ नोव्हेंबरपासून किवी संघाविरुद्ध तीन सामन्यांची एकदिवसीय मालिका सुरू होणार आहे. २०२२ या वर्षात सूर्यकुमार यादवपेक्षा इतर दुसऱ्या भारतीय खेळाडूने जास्त धावा केल्या नाहीत. तरी देखील त्याला बांगलादेश दौऱ्यातून वगळण्यात आले. भारताचा स्फोटक ३६० डिग्री फलंदाज सूर्यकुमार यादवने टी२० क्रमवारीत पहिल्या स्थानावर कायम आहे. निवडकर्त्यांचा सूर्यकुमार विश्वास संपादन करू शकला नाही असे शक्यच नाही, असे त्याचे चाहते म्हणत आहेत. बीसीसीआयच्या या निर्णयावर काही चाहत्यांनी आगपाखड देखील केली.

आशिया चषकात झालेल्या दुखापतीतून जडेजा अद्याप सावरलेला नाही. शस्त्रक्रियेनंतर त्याला आणखी विश्रांतीची गरज आहे. त्यामुळे त्याच्या जागी वनडे संघात बंगालचा अष्टपैलू शाहबाज अहमद याची वर्णी लागली. दुसरीकडे एकदिवसीय संघात प्रथमच निवड झालेला उत्तर प्रदेशचा उमदा वेगवान गोलंदाज यश दयाल हा पाठीच्या दुखापतीमुळे या दौऱ्याला मुकणार आहे. त्याच्याजागी आयपीएलमध्ये राजस्थान रॉयल्स व सध्या सुरू असलेल्या विजय हजारे ट्रॉफीमध्ये मध्य प्रदेशसाठी उत्कृष्ट कामगिरी करणारा वेगवान गोलंदाज कुलदीप सेन याची निवड केली आहे.

### बांगलादेश दौऱ्यासाठी भारताचा कसोटी संघ

**रोहित शर्मा (कर्णधार), केएल राहुल (उपकर्णधार), शुबमन गिल, चेतेश्वर पुजारा, विराट कोहली, श्रेयस अय्यर, ऋषभ पंत (यष्टीरक्षक), केएस भरत (यष्टीरक्षक), रविचंद्रन अश्विन, रवींद्र जडेजा, अक्षर पटेल, कुलदीप यादव, शार्दुल ठाकूर, मोहम्मद शमी, मोहम्मद सिराज, उमेश यादव.**

### बांगलादेश दौऱ्यासाठी भारताचा एकदिवसीय संघ

**रोहित शर्मा (कर्णधार), केएल राहुल (उपकर्णधार), शिखर धवन, विराट कोहली, रजत पाटीदार, श्रेयस अय्यर, राहुल त्रिपाठी, ऋषभ पंत (यष्टीरक्षक), ईशान किशन (यष्टीरक्षक), शाहबाज अहमद, अक्षर पटेल, वॉशिंग्टन सुंदर, शार्दुल ठाकूर, मोहम्मद शमी, मोहम्मद सिराज, दीपक चहर, कुलदीप सेन.**

महाईन्यूज
जाहिरात आणि बातम्यांसाठी संपर्क
9657767000

महाईन्यूज नोंद असूद्या..
महाईन्यूजची डिजीटल आवृत्ती छपाईसाठी नाही